लाल आणि निळी टोपी

नायजेरियाची लोककथा

आइरिस लिटिलमैन, चित्र: जेनिस स्क्विंगटन

मराठी: अश्विनी बर्वे





लाल और निळी टोपी

नायजेरियाची लोककथा

आइरिस लिटिलमैन, चित्र: जेनिस स्क्विंगटन
मराठी: अश्विनी बर्वे



खूप वर्षांपूर्वी खूप दूरवरच्या एका छोट्या गावात, दोन मुलं होती. आणि त्यांचे परिवार एकमेकांच्या शेजारी राहत असत. ही मुले एकमेकांचे चांगले मित्र होते. जेव्हा ते पहिल्यांदा भेटले, तेव्हा ते आईच्या पाठीवरच्या झोळीत बसलेली छोटी बाळं होती,त्यांनी चमचम करणारे कपडे घातलेले होते. ते दोघे एकमेकांकडे इतक्यावेळ रोखून बघत असत, जोपर्यंत एकजण रडत नसे आणि दुसरा हसत नसे. मग एक मुलगा दुधासाठी ओरडत असे आणि दुसरा रडायला लागत असे. जेव्हा त्यांना चालायला यायला लागले, तेव्हा ते शेताच्या बांधावर येऊन ओरडत असत. त्यांच्या आयांच्या लक्षात आले की या दोन्ही मुलांना सतत एकमेकांच्या बरोबर राहण्याची इच्छा आहे. एक मुलगा उंच आणि अशक्त होता, म्हणून लोक त्याला लंबू म्हणत असत. दुसरा मुलगा एवढा उंच आणि अशक्त नव्हता, म्हणून लोक त्याला छोटू म्हणत असत.

जसजसे ते मोठे झाले, लंबू आणि छोटू एका टीमसारख्या सगळ्या गोष्टी ते बरोबर करत. ते जंगलात एकमेकांच्या बरोबर फिरत आणि महोगनीच्या झाडांमध्ये पकडापकडी खेळत. एकमेकांच्या बरोबरच ते बाजारात जात, जिथे ते कवड्याच्या बदल्यात गोळ्या आणि खाण्याची मिठाई विकत घेत असत. ते एका ताडाच्या झाडाखाली बसून ढोल वाजवण्याचा आणि गोष्ट ऐकण्याचा अभ्यास करत असत. ते प्रत्येक क्षण एकमेकांच्या बरोबर घालवत असत. तरीही त्यांच्यात कधी वाद होत नसत.जेव्हा गावातले लोक त्यांच्याकडे बघत, तेव्हा ते म्हणत, “लंबू आणि छोटू सगळ्यात चांगले मित्र आहेत.”

जेव्हा लंबू आणि छोटू तरुण झाले, तेव्हा त्यांच्या आईवडिलांनी त्यांना सांगितले की,आता तुमचे लग्न करण्याची वेळ आली आहे. त्याविषयी बोलण्यासाठी लंबू छोटूच्या घरी गेला.

“ऐक ना छोटू,” तो म्हणाला, “माझ्या आईवडिलांनी मला पत्नीचा शोध घ्यायला सांगितले आहे. ते म्हणतात की मी आता मोठा झालो आहे आणि आता मी माझे शेत सांभाळले पाहिजे. मला ऐकून खूप वाईट वाटले कारण मला आता ही जुनी जागा सोडावी लागेल. आता आपण रोज एकमेकांना भेटू शकणार नाही. शेती करण्यासाठी मला खूप दूर जावं लागण्याची शक्यता आहे. भविष्यात आपण नक्कीच भेटू, एकमेकांना भेटण्यासाठी आपल्याला खूप अंतर कापावे लागेल.”

“एक मिनिट थांब लंबू, माझा तुझ्या सांगण्यावर विश्वास बसत नाही,” छोटू म्हणाला. “बघ ना, काल रात्री माझे वडील आणि मी फिरायला गेलो होतो. त्यांनी मला सांगितले की आता तुला तुझी जमीन शोधली पाहिजे म्हणजे तू लग्न करून तुझे कुटुंब वाढवू शकशील.मी सकाळपासून खूप उदास होतो की आपल्या मैत्रीचे काय होईल मग?”

“ही खरच त्रास देणारी समस्या आहे,” लंबू म्हणाला. “आपल्याला याचे उत्तर शोधण्यासाठी मिळून काम करायला पाहिजे. आपण आपली मैत्री नजरअंदाज करू शकत नाही. सांग बरं, मला तुझ्या इतका दयाळू आणि चांगला शेजारी कुठे मिळेल?”

“पण माझ्या मित्रा, याचे एकच उत्तर आहे! तू निश्चिंत रहा- ना तू आणि ना मी कधीही अनोळखी व्यक्तीला शेजारी करणार नाही,कारण आपण दोघे नेहमीच एक दुसऱ्यांचे शेजारी राहू!” छोटू म्हणाला.

तू कोड्यात बोलत आहे, छोटू.कृपया नीट स्पष्ट करून सांग.

“हे खरे नाही का? की आपण तरुण झालो आहोत हे?”

“हो, आईवडिलांचे घर सोडण्याची वेळ आली आहे.”

“शेत खरेदी करण्यासाठी आपला शोध आपण चालू करणार आहोत हे खरे नाही का?”

“हो, ,कोणाकडे विकण्यासाठी शेत आहे याबाबतीत आपल्याला लवकरच गावातील मोठ्या माणसाशी बोलावे लागेल.

“आपण प्रत्येक काम एक टीम म्हणून करत नाही का?”

“हो!”

“तर हेच उत्तर आहे. आपण आपली जमीन एकमेकांच्या बरोबर खरेदी करू! आपण जमिनीचा मोठा तुकडा खरेदी करू आणि त्याचे दोन भाग करून वाटून घेऊ.”

छोटू तू एक मस्त आणि समजदार मित्र आहे.आपण अशा दोन व्यक्ती असू ज्यांची शेते एकमेकांच्या जवळजवळ असतील, ठीक तसेच जसे आपल्या लहानपणी होते”.

म्हणून दोन्ही मित्र जमीन खरेदी करण्यासाठी निघाले.ज्याच्या ज्यांच्याशी ते बोलले त्यांनी त्यांना निरुत्साही करण्याच्या प्रयत्न केला.

“काही खरेदी करायचं आणि मग ते वाटून घ्यायचं हा काही चांगला विचार नाही,” एका गावातला माणूस, ज्याच्याकडे खूप जमीन होती तो म्हणाला. “जमिनीचा काही तुकडा मोठा किंवा ओसाड किंवा खडकाळ असू शकतो, म्हणून एका व्यक्तीला चांगला तुकडा मिळेल. आणि हे सांगायची गरज नाही की दुसऱ्या व्यक्तीला आपण फसवलं गेलो आहोत असे वाटेल.“

“दोन मित्र पूर्वी कधी कोणत्याही गोष्टीबाबत वाद घालत नसत, ते मग जमिनीसाठी भांडायला लागतील.” दुसरा माणूस म्हणाला.





लंबू आणि छोटूने गावातल्या लोकांचा सल्ला मानायचा नाही असे ठरवले. त्यांचा त्यांच्या मैत्रीवर विश्वास होता. त्यांनी आपले पैसे एकत्र केले,विक्रीसाठी त्यांनी एक मोठे शेत शोधले आणि ते खरेदी केले. त्यांनी जमिनीचा नकाशा तयार केला.

खूप मेहनत घेऊन त्यांनी ओसाड, खडकाळ ,मुरूम आणि समतल भागांची नोंद घेतली. त्यानंतर त्यांनी ठरवले की जमिनीचे दोन भाग करण्यासाठी नकाशावर कुठे रेघ आखायची. आपले काम पूर्ण झाल्यावर ते एका सपाट दगडावर बसले.

“छोटू, तू समाधानी आहेस ना, आपण आपल्या संपत्तीचे योग्य विभाजन केले ना?”

“आपण योग्य विभाजन केले आहे असे तुला वाटत असेल तर मला समाधान होईल,” छोटूने हसत म्हटले. त्यांनी मातीतल्या रेघेवर एका बाजूला एक्स आणि दुसरीकडे ओ लिहले.

लंबूने एक अक्रोड घेतले आणि त्यावर चाकूने एक्स कोरले.मग त्याने दुसऱ्या अक्रोडावर ओ कोरले. छोटूने दोन्ही अक्रोड एका टोपलीत ठेवले आणि दोघांनी आपले डोळे बंद करून एक एक अक्रोड उचलले. अशा पद्धतीने यांनी आपल्या जमिनीचे वाटप केले. त्यांनी मातीत आखलेल्या रेषेवर एक वाकडीतिकडी पायवाट तयार केली. जी दोन्ही शेतांच्या मधून जात होती. एका टीमसारखे काम करून त्यांनी प्रथम लंबूसाठी झोपडी तयार केली आणि नंतर छोटूसाठी झोपडी बांधली.



गावात सगळेचजण खूप हैराण झाले होते. लंबू आणि छोटूने कोणत्याही भांडणाशिवाय आपल्या जमिनीचे वाटप केले होते. त्यात ते यशस्वी झाले होते.

गावातले लोक जमिनीच्या वाटपानंतर त्यांची वाकडीतिकडी पायवाट बघण्याच्या उत्सुकतेने त्यांच्या शेतात येत. ते एकमेकांना म्हणत, “या दोन चांगल्या मित्रांशिवाय कोण आपली जमीन वाटपासाठी अशी पद्धत शोधून काढू शकेल?”

“नमस्कार, लंबू!” एक शेजारी अचानक येऊन म्हणाला, “तुझे नवीन शेतात कसे चालू आहे?”

“खूप छान,” लंबू म्हणाला. “मी आज छोटू बरोबर शेतात काम केले.”

“म्हणजे तू शेतात काम केलं आहे असे तुला म्हणायचं आहे, आणि छोटूने त्याच्या शेतात काम केलं, आणि तुम्ही दोघांनी एकमेकांना हात हलवून अभिवादन केलं,” शेजारी म्हणाला.

“नाही, तुम्ही चुकीचा अर्थ घेतला,” छोटू आपल्या झोपडीतून बाहेर येत म्हणाला. “काही दिवस, लंबू माझ्या शेतात मला मदत करेल, मग आम्ही दोघं त्याच्या शेतात काम करू. अशा पद्धतीने आम्ही एकमेकांना मदत करतो आणि दिवसभर एकतर राहतो.”

“याचा अर्थ तुम्ही दोघं बिलकुल एकाचा प्रमाणात रताळी आणि भुईमुग उगवतात?”

“बिलकुल नाही,” लंबू म्हणाला. “असे कधी होणार नाही,कारण किती पीक येईल हे कोणी सांगू शकत नाही.”

“अच्छा, ठीक आहे, आता मला सांगा जर तुमच्यापैकी एखाद्याचे उत्पन्न जास्त आले तर काय होईल?” शेजाऱ्याने विचारले.

छोटू आणि लंबू हसले. “ही आमच्यासाठी काही समस्या नाही. आम्हीं आमचे जीवन एकमेकांना सोपवले आहे,” छोटू म्हणाला.

“आम्ही कधी एकमेकांशी कधी कठोर शब्दात बोललो नाही,” लंबू म्हणाला.

लवकरच लंबू आणि छोटू त्यांच्या मैत्रीमुळे आसपासच्या गावात प्रसिद्ध झाले. लोक जेव्हा त्यांना बाजारात बघत तेव्हा म्हणत,लंबू आणि छोटू सगळ्यात चांगले मित्र आहेत."

हे विचित्र वाटेल पण लोकांना दुसऱ्यांच्या आनंदाचा मत्सर वाटतो.असेच एका माणसाने जेव्हा लंबू आणि छोटूच्या मैत्रीबद्दल ऐकलं तेव्हा त्याला असाच मत्सर वाटला. त्या माणसाचे नाव स्नेक होते, आणि तो खूप चतुर होता. स्नेकने दोन्ही मित्रांमध्ये वाद घडवून आणण्याचे ठरवले.

तो हाताच्या कामात कुशल होता आणि त्याने गपचूप एक नवी टोपी शिवली. टोपी गावात लोक घालत तशी सामान्य नव्हती.पण त्या टोपीत एक खूप अनोखी गोष्ट होती.

स्नेकने कपड्याच्या दोन तुकड्यांनी आपली टोपी शिवली होती. एक तुकडा लाल होता, आणि दुसरा निळा. टोपी समोरून मागे पर्यंत दोन भागात शिवली होती. जर तुम्ही स्नेकच्या उजवीकडे बघितले तर तुम्हाला ती लाल दिसेल आणि जर तुम्ही डावीकडे बघितले तर ती निळी दिसेल. स्नेकने आपली टोपी घातली आणी गावाच्या बाहेर फेरफटका मारायला तो निघाला. जिथे लंबू आणि छोटू यांचे जवळजवळ शेत होते तिथे तो गेला.

स्नेकने बघितले की दोघेजण बरोबर काम करत नाही ना?मग तो त्या वाकड्यातिकड्या पायवाटेवरून चालू लागला. सगळ्यात आधी त्याला छोटू भेटला,जो आपला भुईमुग बांधत होता.

“नमस्कार” स्नेक म्हणाला. “तुझा भुईमुग चांगला आला आहे.”

“धन्यवाद,” छोटू म्हणाला, “तशी तर तुझी टोपी सुद्धा खूप छान लाल आहे.”

टोपीकडे तुझे लक्ष गेल्याबद्दल धन्यवाद,” स्नेक म्हणाला. “ही एक नवी टोपी आहे आणि मी आज पहिल्यांदाच घातली आहे.”

स्नेकने आपली टोपी सरळ केली आणि तो पुढे गेला.

थोड्यावेळाने त्याने बघितले की लंबू आपल्या रताळ्याच्या शेतात निंदणी करत आहे.

“अच्छा! तू इथे आहे तर, नमस्कार” स्नेक म्हणाला.

“इथे तुमच्याकडे किती चांगली जमीन आहे.”

“खूप खूप धन्यवाद,”लंबू म्हणाला, “यावर मी काय म्हणू शकतो. ही सुंदर निळी टोपी छान दिसत आहे.”

टोपीकडे लक्ष दिल्याबद्दल धन्यवाद,” स्नेक म्हणाला. “ही एक नवीन टोपी आहे आणि आज मी पहिल्यांदाच घातली आहे.” असे म्हणून स्नेक पुढे चालत गेला आणि जंगलाच्या रस्त्याने घराकडे निघाला.

काहीवेळा नंतर लंबू आणि छोटू एका ठिकाणी बसून रताळी खाऊ लागले.

“तू तो माणूस बघितला का?ज्याने निळी टोपी घातली होती तो? लंबूने विचारले.

“हो मित्र ,मी एका माणसाला बघितले पण त्याने लाल टोपी घातली होती. टोपी खूप सुंदर होती.

“लाल टोपी? अरे तू खूप वेळ उन्हात काम केले आहे,” लंबू हसला.

“त्या माणसाने निळी टोपी घातली होती. मी त्या माणसाशी याबाबत बोललो सुद्धा.”

लंबूला हे समजत नव्हते की छोटू त्या माणसाची टोपी लाल होती यावर जोर का देत आहे. तो लंबूवर विश्वास का ठेवत नाही. त्याने टोपी आपल्या डोळ्यांनी बघितली होती आणि ती निळी होती. छोटुला यामुळे राग आला होता आणि लंबू टोपीच्या रंगाबाबत शंका का घेत आहे. हे त्याला कळत नव्हते. ते दोघे एकमेकांवर ओरडू लागले.

"लाल टोपी!"

"निळी टोपी!"

"लाल! लाल! लाल!"



त्यांची हातापायी होणारच होती तेवढ्यात स्नेक परत आला. "ओह, हो!" तो म्हणाला. "हे काय चालू आहे? जगातले दोन चांगले मित्र आपापसात भांडत आहेत?"

लंबू आणि छोटूने एका क्षणात ओरडणे बंद केले आणि ते स्नेककडे रोखून बघू लागले.

"आम्हाला एकटे सोडा." ते म्हणाले. "आम्ही तुमच्या टोपीच्या रंगावरून भांडत आहोत."

स्नेक हसला. “तुम्ही माझ्या टोपीकडे निरखून बघायला पाहिजे,” तो चेष्टा करत म्हणाला.

त्याचवेळी लंबू आणि छोटूच्या लक्षात आले की स्नेकची टोपी एका बाजूला लाल आणि दुसऱ्या बाजूला निळी होती.

“आम्ही आयुष्यभर एकमेकांचे मित्र होतो, तरीही तू आमच्या दोघांमध्ये भांडण लावले!” ते ओरडले.

“मला दोष देऊ नका,” स्नेक म्हणाला. “तुम्ही दोघे बरोबर होते, पण त्याचवेळी तुम्ही दोघे चुकीचे सुद्धा होते. मी तुम्हाला भांडायला सांगितले नाही.तुम्ही दोघांनी आपापल्या नजरेने टोपीकडे बघितले.भविष्यात लक्षात ठेवून प्रश्नाच्या दोन्ही बाजूकडे बघा.

लंबू आणि छोटुला स्नेक्चे म्हणणे पटले. ही त्यांची पहिले आणि एकमेव भांडण होते. लवकरच त्यांनी आपल्या गावातली तरुणीशी लग्न केले आणि आपापले कुटुंब उभे केले. ही त्यांची नियती होती की ते जीवन भर एकमेकांचे सगळ्यात चांगले मित्र राहिले.

अंत